R.N.I.16775/68 Regd. No. MCW-126/2018-20, Published on 15th of every month.



# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाचार

एकूण पाने १६ प्रती अंक रु. ५/-
वर्ष ५३ वे, अंक ३ रा, मुंबई. जानेवारी २०२० वार्षिक वर्गणी रु. ५०/-

## सोलापूर देऋब्रा युवक शाखेतर्फे वंचितांना ५० जणांचे भोजन;



देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेच्या युवक शाखेतर्फे आणि समर्थ केटरर्सचे प्रसाद कुलकर्णी यांच्या सहकार्याने समाजातील वंचित असलेल्या ५० नागरिकांना एकवेळचे भोजन देण्यात आले. रॉबीन हूड आर्मीचे प्रा. हिंदुराव गोरे यांच्याकडे हे भोजन सुपूर्द करण्यात आले. यावेळी बोलताना प्रा. गोरे म्हणाले, रॉबीन हूड आर्मीचे कार्य अनेक देशांमधून चालते. या संस्थेचे कार्य म्हणजे उरलेले चांगले अन्न भुकेल्यापर्यंत पोहोचविले जाते. मोठमोठ्या समारंभातून अनेकवेळेला अन्न उरते. मात्र असे अन्न न फेकता ते वंचितांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य आम्ही करतो. सोलापुरातील वेगवेगळ्या भागात २५० स्वयंसेवक हे कार्य करतात. आम्हाला फक्त अन्न उरल्यास फोन करावयाचा आम्ही स्व खर्चाने हे घेऊन जातो. विशेष म्हणजे रॉबीन हूड आर्मी ही संस्था एक नव्या पैशाचाही व्यवहार करीत नाही. याबरोबरच अनेक अन्नदाते आपल्या आठवणीच्या प्रसंगीही सुग्रास भोजन आम्हाला देतात. आता जवळपास ३६५ दिवस अन्न देणारे दातेही आम्हाला मिळाले आहेत. परंतु हे काम पुरसे नाही. त्यामुळे देऋब्रासारख्या संस्थांनी पुढे येण्याची गरज आहे.

**सोबत फोटो:** देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था सोलापूरच्या युवक शाखेतर्फे ५० वंचितांना अन्नदान करण्यात आले. रॉबिन हूड आर्मीचे प्रा. हिंदुराव गोरे यांच्याकडे सुग्रास अन्न सुपूर्द करताना संस्थाअध्यक्ष प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर. यावेळी युवक शाखा अध्यक्ष सुनिल हरहरे, दत्तात्रय आराध्ये, सुशांत कुलकर्णी, शंकरराव कुलकर्णी, प्रसाद कुलकर्णी, हरीभाऊ जतकर आदी उपस्थित होते.

---

## माजी आमदार प्रभाकर संत, 'कल्याण वैभव' पुरस्कारानी सन्मानीत



आपल्या देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ. कल्याणचे जेष्ठ माजी शिक्षक आमदार माननीय श्रीमान प्रभाकरपंत संतसर यांना कल्याण येथे रविवार दिनांक ०५ जानेवारी २०२० रोजी पत्रकार दिनाच्या पुर्व संध्येस झालेल्या साप्ताहिक कल्याण वैभवच्या पाचव्या वर्धापन दिनानिमित्त झालेल्या कार्यक्रमात जीवन गौरव पुरस्कार कल्याणचे माजी आमदार श्रीमान नरेंद्र पवार व कल्याण जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष माननीय श्रीमान ॲडव्होकेट सुरेशराव पटवर्धन यांच्या हस्ते मानपत्र, सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

---

# २६ जानेवारी, प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा!




अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाजाची मुखपत्रिका

**समाचार**

वर्ष ५३ वे, अंक ३ रा, जानेवारी २०२०

( फक्त सभासदांसाठी)


❖❖❖


**श्री. विलास जोशी**
अध्यक्ष

**श्री. प्रभाकर कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

**श्री. प्रसाद ठकार**
कार्यवाह

❖❖❖

***संपादक समिती***

श्री. प्रभाकर अ. संत
डॉ. लक्ष्मीकांत दाणी
श्री. शरद पां. पारसनीस
श्री. प्रमोद नाईक
श्री. बापूराव कुलकर्णी

❖❖❖

**अंकातील मजकूराशी मंडळ सहमत असेलच असे नाही**



**आजीव सभासद वर्गणी ५०० रुपये**
**प्रति अंक ५ रुपये**



**दूरध्वनी : २४३०२२७३, २४३०७५७३**

**ई मेल :** aadrbm@gmail.com
**संकेत स्थळ :** www.adrbmmahim.in


# संपादकीय: हिंसाचार व मालमत्तेची नासधूस थांबवा

नागरिकत्वाच्या कायद्यावरुन देशांत उभी फूट पडली आहे. दोघांची मते पक्की आहेत. त्यामुळे निदर्शने मोर्चे यांनी देश ढवळून निघाला आहे. त्यांत जवळजवळ ऐंशी/नव्वद टक्के हिंसाचार व देशाच्या सार्वजनिक मालमत्तेची नासधूस होताना दिसते आहे. अलीकडच्या दोन महिन्यांत देशाच्या सार्वजनिक मालमत्तेचे कांही हजार कोटी रुपयाचेवर नुकसान झाले आहे. आर्थिक मंदिच्या काळांत ही गोष्ट क्षम्य नाही. जीवीतहानीही झाली आहे. कांही संसार उध्वस्त झाले आहेत. वादाच्या कोणत्याही बाजूचे समर्थन न करतां संलग्न संस्थानी हिंसाचार व सार्वजनिक मालमत्तेची नासधूस थांबवण्याचा आहोकाट प्रयत्न करावा. आपल्या पाल्यांवर लक्ष ठेवावे व त्यांचे समुपदेशन करावे ही विनंती. **- संपादक**

---

## दुःखद निधन:श्रद्धांजली

आपल्या मध्यवर्ती मंडळाचे सचिव श्री. प्रसाद ठकार (मोबाईल नं ९९३०७४८९३६) यांच्या वडिलांचे श्री. जनार्दन दिगंबर ठकार यांचे २८/१२/२०१९ रोजी वयाच्या ८६ व्या वर्षी दीर्घ आजाराने निधन झाले. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो. ओम् शांती, शांती, शांती. मध्यवर्ती मंडळ ठकार कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहे. मध्यवर्ती मंडळातर्फे विनम्र श्रद्धांजली !

---

## श्री. विलासराव कुलकर्णी याचे थोरले बंधु
## श्री. बबनराव कुलकर्णी (वय ८८) यांचे दुःखद निधन

**- संपादक**

मध्यवर्ती मंडळाचे अनेक वर्षाचे माजी पदाधिकारी व मुलूंड संस्थेचे विद्यमान अध्यक्ष श्री. विलासराव कुलकर्णी यांचे थोरले बंधू श्री. बबनराव कुलकर्णी यांचे (वय ८८) दुःखद निधन दिनांक ३०/१२/२०१९ रोजी पुणे येथे झाले. त्यांच्या सारखे दुर्मिळ व्यक्तीमत्व लाभणे हे कुलकर्णी कुटुंबाचे महद्‌भाग्यच आहे. आपल्या काळांत एकत्र कुटुंबपद्धती पार लयाला गेली असतांना त्यांनी वडलांचे पश्चात सर्व बंधुच्या कुटुंबाना पालकत्वाप्रमाणे जपले व एकत्र ठेवले. ह्याच त्यांची जबाबदारीची जाणिव तसेच सर्व बंधुच्या कुटुंबाचा समंजसपणा अधोरेखित करायला हवा.
आपणास अशक्य वाटेल असा कुलकर्णीकुटुंबाचा एकत्रीत अर्थ व्यवहार होता. तीस/चाळीस कुटुंबीयांचा चार पांच भावंडाचा एव्हढेच नव्हे तर घरांत नव्याने आलेल्या सुनांचा सर्व अर्थवव्यहार श्री. बबनराव सांभाळात असत. सर्वांनी आपली कमाई बबनरावांच्या ताब्यांत देणे व लागतील तसे पैसे त्यांच्याकडून घेणे असा व्यवहार होत असे. कोणी जेव्हढे दिले त्यापेक्षा त्यांनी अधीक उचल केली तरी चालत असे. बबनराव पैसे कशासाठी हवे आहेत, एव्हढे कशाला घेता असे एका शब्दाने विचारत नसत. आजच्या काळांत हे सारे आव्दीतीय व अलौकीक असेच आहे.
श्री. बबनराव कुलकर्णी हे अध्यात्मविद्येचे सर्वंकष अभ्यासक होते. ते अध्यात्मविद्येचे केवळ अभ्यासक नव्हते तर ते अध्यात्म जगले. त्याचेशी बोलताना १/२ प्राथमिक वाक्ये झाल्यावर ते अध्यात्म शास्त्राचे दाखले देत विवेचन करीत. त्यांचेमुळे कोणालाही प्रेरणा मिळत असे अशा दुर्मिळ व्यक्तिमत्वाच्या निधनाने जी पोकळी निर्माण झाली आहे ती भरून निघणे अशक्य आहे. मध्यवर्ती मंडळ विनम्र श्रद्धांजली वाहत असून कुळकर्णी कुटुंबाच्या दुःखात सहभागी आहे.

# वारकरी संप्रदायाचा इतिहास

- डॉ. शरद कुलकर्णी, ९४२३१५११३३

भारतात अनेक धर्म आहेत, त्यापैकी हिंदू धर्म हा एक प्रधान धर्म आहे. हिंदु मध्ये अनेक संप्रदाय, पंथ आहेत. समर्थ संप्रदाय, नाथ संप्रदाय, जैन संप्रदाय, दत्त संप्रदाय, नागेश संप्रदाय, इत्यादी त्यापैकीच पंढरपूरचा 'वारकरी संप्रदाय' हा एक होय.

वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्रातल्या महत्वपूर्ण धर्म संप्रदायापैकी एक प्रमूख संप्रदाय आहे. या संप्रदायाच्या अनुयायांची संख्याही लक्षणिय आहे कारण......

(१) समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचलेला, समाजातील सर्व स्तरातील लोकांना ऐहिक आणि पारलौकिक उत्कर्षाचा मार्ग दाखविणारा संप्रदाय म्हणून या संप्रदायाची एक विशिष्ट प्रतिमा जनमानसात निर्माण झाली आहे. (२) जटील कर्मकांडाच्या पोलादी पाशातून मूक्त करण्याची प्रेरणाही या संप्रदायांनी आपल्या मनांत जोपासली होती. (३) उच्चनिचता, स्पृश्यास्पृश्यता, वर्णश्रेष्ठ आदी विचारांनी समाजावर जे सावट येवू लागले होते ते या संप्रदायानी दूर झूगारून दिले. (४) स्त्री आणि शूद यांना समाजात जी विषम वागणूक दिली जात होती तिच्या विरुद्धही या संप्रदायाने आपल मत नोंदवले. (५) समाजात दिसणाऱ्या विषमतेवर कठोर प्रहार करणारे अक्षरवाडमय वारकरी पंथाने जगाला प्रदान केले. (६) मुक्ताबाई, जनाबाई, बहिणाबाई, सोयराबाई या सारख्या संत कवयत्री यांचा आणि चोखोबा, गोरोबा, सावतोबा, सेना न्हावी, कममिळा नरहरी सोनार या सारख्या विविवध जाती - जमातीतल्या संतांचा उद्भव होण्यामागे वारकरी संप्रदायाने स्विकारलेल्या 'सर्वाभूती भगवद्भावाची' प्रेरणा होती. (७) या प्रेरणेमुळे समाजातील जीवन निर्मळ, नितळ झाले. भक्ती विचाराला सद्सद् विवेकाची जोड लाभली. सामाजिक न्यायाचे अधिष्ठान लाभले, अनावश्यक कर्मकांड, अंधश्रद्धा, बुवाबाजी यांच्यावर या संप्रदायाने कठोर प्रहार केले आणि अशा अप प्रवृत्तीचा निषेध केला. वारकरी संप्रदायाचे हे प्रबोधन कार्य जसे धार्मिक नि अध्यात्मिक स्वरूपातच होते, तसेच ते ऐहिक, सामाजिक, सांस्कृतिक स्वरूपाचेही होते. (८) वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्रातला सर्वात मोठा संप्रदाय आहे. भागवत धर्म हा बहूसोपा अशी तुकोबांनी ग्वाही दिलेली आहे. यात सोवळ्याचा अतिरेक नाही, कर्माची कटकट नाही, की तंत्राची भानगड नाही. त्यामुळे सर्वांना तो सुलभ आहे.

काळानुक्रमे संतनामदेव, ज्ञानेश्वर, भानुदास जनार्दनस्वामी, एकनाथ, संत तुकोबा आदि संतापैकी फक्त एकट्या संत नामदेवाचाच मुळ विठ्ठलपंथ होता. (१) पान व पंढरपूरचा श्री विठ्ठल या संप्रदायाचे एकमेव उपास्य दैवत होय. भक्त पुंडलिक हा या संप्रदायाचा आद्यप्रवर्तक मानल्या जातो. संतांच्या अभंगातून तसे उल्लेख आहेत. "पुंडलिक भक्तराज तेणे साधियेले काज, वैकुंठीचे निज परब्रह्म आणिले।"

संत पुंडलिकाचा काळ शालिवाहन शतकाचे पहिले शतक धरल्यास पंढरपूरास दोन हजार वर्षाचा इतिहास आहे. वारकरी संप्रदायाचा उगम तेथून मानला जातो. भक्त पुंडलिकानी महत् प्रयासाने परमसत्तेला जन/जगद् उध्दारार्थ निराकारातून निर्गुणातून सगूण साकारतेत आणले.

श्रीमत भागवत स्कंध २ अध्याय ९ श्लोक ३५ चरण २ च्या उत्तरार्धात यत्स्यात्सर्वय सर्वदा या चतु:श्लोकी भागवत धर्माच्या सर्वाभूती सम भगवत्भावाचा हा वारकरी पंथ आहे. या पंथातील समभावाचे प्रतिकरूप श्री विठ्ठल सर्व देवात वरिष्ठ आहे. सर्वजगात वरिष्ठ चंद्रभागातिर्थ व सर्वश्रेष्ठ पंढरीक्षेत्र अशा तिर्थक्षेत्री देवांच्या अप्रतिम वैभवयुक्त वारकरी संप्रदायाचा इतिहास आहे.

**उदंड पाहिले, उदंड ऐकिले उदंड वर्णिले क्षेत्र महिमे। ऐसीं चंद्रभागा, ऐसे भिमातीर, ऐसा विटेवरी देव कोठे।।**

बाकीचे सर्व नामदेवाच्या विठ्ठल संप्रदायात नंतर येवून सामील झाले.

नामदेवाचे पूर्वज वैष्णव संप्रदायाचे होते. तथापि नामदेवांनी पुढे या शैव व वैष्णव संप्रदायाची एकी करण्याचा प्रयत्न केला. संत नामदेव १७-१८ वर्षाचे असतांनाच त्यांचा वारकरी संप्रदायात बोलबाला झाला. संत भानूदासांनी सूर्यसंप्रदायातून प्रेरणा घेवून विठ्ठलपंथात प्रवेश केला. पुढे संत तुकोबा देहूकराच्या चैतन्यसंप्रदाय प्रवेशाने तर खूपच गर्दी केली.

संतनरहरी सोनाराचे १२१२-१३ चे सुमारास मनपरिवर्तन होवून ते नाथपंथ सोडून विठ्ठलपंथी झाले.

शके १२१४ त ज्ञानेश्वर नामदेव प्रथम भेट झाली. सततच्या तीर्थयात्रेत संत नामदेवाने संत ज्ञानेश्वराचे शके १२१६ साली मनपरिवर्तन केले. या भेटी नंतरच या दोन महापुरुषांची युती होवून ज्ञानेश्वरांचे नाथपंथ संत नामदेवाचे विठ्ठलोपासक वारकरी पंथात प्रवेशिला व संत ज्ञानेश्वरांनी शिवोपासक नाथपंथ सर्व अनुयायासह विठ्ठलोपासनेत पंढरीस चंद्रभागेच्या काठी उभा केला.

तीर्थयात्रा संपल्यानंतर शके १२१७ त ज्ञानदेवाने संत नामदेवाचे गुरुत्व मान्य केल्याची कबुली तीर्थवळीचे अभंगात त्यांनी स्वत:

दिली. संत नामदेवाचा पुरोगामी सर्वाभूती समदृष्टीचा भागवत धर्म हा सर्वाहून चांगला असा राजमार्ग असल्याची कबुली दिली. योगीयांचा नाथपंथी शैव मार्ग नामधारक वैष्णवांच्या भक्तीमार्गात नामदेवांनी आणला म्हणून अशा संतास धन्य धन्य नामदेव, सर्व वैष्णवांचा ......... असे एकनाथ म्हणतात.

देव म्हणे तू भक्त शिरोमणी, जोडीले जन्मुनी केशव चरण

ज्ञानेश्वराचे पणजे - त्रिंबकपंत यांना गोरखनाथाकडून, आजे गोविंदपंतांना गहिनीनाथाकडून उपदेश मिळाला होता. याच गहिनीनाथांनी निवृत्तीनाथांना नाथ पंथाची दिक्षा दिली. निवृत्तीनाथांना श्रीकृष्ण भक्तीबरोबर नाथ-वारकरी संप्रदायाला नवीन वळण दिले.

शके १२०९ पासून शके १२१७ पर्यंत क्रमशः सुसंघटीत वाढ केलेल्या विठ्ठलोपासक संप्रदायास स्थायी रुप देण्यासाठी संत नामदेवाने शके १२१७ मध्ये पहिला वारकरी संप्रदाय-फड पंढरपूरला स्थापन केला. हाव सुसंघटीत वारकरी पंथाचा आरंभ मानावयास हरकत नसावी.

वारकऱ्यांनी अठरा पगड जातीची जी संघटना चंद्रभागेच्या वाळवंटात केली ती किती खोलवर रूजली आहे याचे प्रत्यंतर या आषाढी - कार्तिकीच्या वेळी दृष्टीस येते. देवाच्या अधिष्ठनाच्या खाली फार मोठे लोकोध्दाराचे कार्य या संप्रदायाने चालविले आहे. लोकांना खऱ्या सुखाचा मार्ग दाखविला आहे. वारकरी पंथात संत नामदेवाचे किर्तन.

ज्ञानेश्वराचे प्रवचन (अमृतानूभव) एकनाथाचे भारूड व तुकारामाचे अभंग याला कोणतीच व कुठेही जोड लाभणार नाही.

**भक्तीप्रतापे प्रतापे पावलो मी सुपंथ। सकळ निश्चित परमार्थ।।**

अशा स्वच्छ शब्दात संत नामदेवांनी वारकरी पंथाच्या सफलतेची पावती दिली आहे. संत ज्ञानदेव - नामवेवांनी पुरस्कारिलेला हा भक्ती पंथ कालप्रवाहात खंबीरपणे टिकून राहिला. सतत वर्धिष्णू होत गेला. ज्ञानोत्तर भक्तीचा नंदादीप सतत तेवत ठेवण्याचे कालोचित कार्य वारकरी पंथातील संतसज्जनांनी केले त्यामुळे परतत्वाच्या परिसपर्शाने उजळून गेलेला हा पंथ मराठी माणसाचा संपन्न वारसा झाला.

वारकरी संप्रदायाचा आद्य संघटक म्हणून नामदेवाचे जे स्थान आहे ते योग्यच आहे. आतापर्यंत हे स्थान संत ज्ञानेश्वराला दिले गेले होते. ज्ञानेश्वरांनी या संप्रदायाला तात्विक अधिष्ठान दिले म्हणून ज्ञानदेवे रचिला पाया असे म्हटले जाते व नामदेवानी पंथाला बळकटी आणली म्हनून नामदेव तयाचा किंकर ज्यांनी केला विस्तार असे संत बहिणाबाई म्हणतात.

**ज्ञानदेव, नाथांचे भारुड व तुकारामचे अभंग**

(२) संत नामदेव आणि संत ज्ञानेश्वर परिचयात्मक दृष्टीक्षेपः (१) संत नामदेवाचा जन्म ११९२ तर ज्ञानेश्वराचा जन्म १५ ऑगस्ट, १२७५ मरण समयी नामदेवाचे वय ८० वर्षे तर ज्ञानेश्वर संजीवन समाधी समयी अवघे २२ वर्षाचे होते. (२) संत नामदेव हे वारकरी पंथाचें आद्य संघटक व किर्तन संप्रदायाचे आद्य प्रवर्तक व भक्तशिरोमणी व वैष्णवपंथी चैतन्याचे उपासक होते तर संत ज्ञानेश्वर हे नागपंथी प्रकाशकाचे उपासक होते. (३) संत ज्ञानेश्वर हे उच्चकुलीन ब्राह्मण होते तर नामदेव हे वैश्यकुलीचे एका शिंपी जातीत जन्मले होते. (४) संत ज्ञानेश्वर हे शास्त्र प्रामाण्यवादी होते तर संत नामदेव हे संत प्रामाण्य मानणारे होते. (५) संत ज्ञानेश्वर नाथसंप्रदायी शैव मनाचे योगीराज होते तर संत नामदेव विठ्ठल संप्रदायी वैष्णव मताचे भक्तराज होते. (६) संत ज्ञानेश्वर सनातनी मताचे होते तर संत नामदेव पुरोगामी वृत्तिचे. (७) संत ज्ञानेश्वर सनातन परंपरा आचरणारे होते तर संत नामदेव नवीन परंपरा निर्माण करणारे होते. (८) संत ज्ञानेश्वर फुलासारखे कोमल ह्रदयाचे साधुपुरूष होते तर संत नामदेव ध्येयनिष्ठ, कर्तव्यकठोर वृत्तीचे पंथ प्रचारक होते. (९) संत ज्ञानेश्वरांना निवृत्तीनाथांचा अनुग्रह होता तर संत नामदेवाला सर्वाभूती समदृष्टी, हेचि भक्ती गोमटी हा संप्रदाय मंत्र देणारा विसोबा खेचर हा गीतेसह भागवत हे दोन्ही ग्रंथ जाणणारा व सर्वश्रेष्ठ गायत्रीमंत्र करणारा/जपणारा महान गुरु लाभला होता. (१०) संत ज्ञानेश्वर हे ब्रह्मचारी होते तर संत नामदेवांना आई, वडिल, पत्नी, नारा, विठा, गोविंदा, महादा ही चार मुले, एक बहिण एक मुलगी व स्वतः नामदेव आणि चार सुना असे १४ जणांचे ते कुटुंब वत्सल गृहस्थ होते. (११) ज्ञानेश्वराचे कार्य आळंदी, नेवासे, पंढरपूर, पैठण, आपेगाव परिसर फक्त महाराष्ट्रापुरते सिमीत होते तर संत नामदेवाचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र, राजस्थान, हरियाणा, पंजाब या अनेक राज्यात पसरलेले होते. त्यांना मराठी, कानडी, उर्दू, कोकणी-गुजराती आदी भाषा अवगत होत्या त्यांनी मराठी सारस्वतास अभंगवृत्ताची मौलिक देणगी दिली. (१२) संत नामदेवाने स्वप्नात भागवत बोध तुकोबास केला तर ज्ञानेश्वराने संत एकनाथास स्वप्नदृष्टांत दिला म्हणून नामाचा तुका व ज्ञानाचा एका म्हणू लागले.

# काही राहिलं तर नाही ना।।।

- **डॉ. लक्ष्मीकांत दाणी**, मो. ९८२०४ ३७०७३
email : laxmikant1411@yahoo.com

☞ जीवनामध्ये तुम्ही खूप काही मिळवलं असलं तरी आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर पुढे जात असताना नेहमी हा प्रश्न सर्वांनाच पडतो... 'काही राहिलं तर नाही ना ?" ☞ वर्षभराच्या पोराला बाईच्या हवाली टाकून जॉबसाठी जाणाऱ्या आईला ती बाई जेव्हा विचारते, 'पर्स, चावी घेतली ना, काही राहिलं तर नाही ना ?" ती आई कशी सांगेल कि ज्याच्या भविष्यासाठी एवढा आटापिटा चालू आहे तोच तर राहिला. ☞ खूप आशेने आईबापाने पोराला शिकविले. पोरगा परदेशात सेटल झाला. नातू जन्मला म्हणून आजी आजोबा टूरिस्ट व्हिसावर गेले. ३ महिने झाल्यावर निघताना पोरगा सहजच बोलून गेला, 'सगळ चेक करून घ्या, काही राहिलं तर नाही ना ?" काय उत्तर द्यावे त्या म्हाताऱ्यांना कळेना कारण 'आता मागे राहायला शिल्लक तरी काय आहे" ☞ लग्न होऊन पोरगी वरातीसोबत निघून गेली तेव्हा बापाला आत्या विचारते 'दादा, पोरगी काही विसरली नाही ना रे, काही राहिलं तर नाही ना ?" भूतकाळात गेलेल्या त्या बापाला पोरीच्या रूममध्ये सुकलेली फुले दिसतात. अश्रू लपवत लपवत बाप बोलला, 'ती गेली पण आठवणी इथेच राहिल्या, दुसरे काय राहणार." ☞ ६० वर्षे वय झाल्यावर आज साहेबांचा ऑफिसमध्ये शेवटचा दिवस होता. चपरासी बोलला,' साहेब, काही राहिलं तर नाही ना ?" साहेबानी डोळे बंद केले तर लक्षात आले की पूर्ण आयुष्य या जागी काम करण्यात गेले. सगळच इथे आहे मग 'मागे काय राहणार." ☞ स्मशानात आईच्या चितेला अग्नी देऊन बाहेर पडलेल्या पोराला मित्र विचारतो, 'मित्रा, काही राहिलं तर नाही ना ? तो धावत धावत परत अग्नीजवळ गेला. आईचा चेहरा पाहण्यासाठी केलेला प्रयत्न अयशस्वी झाला. त्याला उमजेना कि काय राहून गेले. डोळे पुसत पुसत तो म्हणाला, 'काही नाही रे, जे राहिले ते आता सदा स्मरणात राहील." ☞ एकदा तरी वेळ काढून मागे बघा. जुन्या आठवणी ताज्या करा. डोळे भरून येईल. मन प्रफुल्लित होईल आणि आत्ताचा हा क्षण जगण्याची नवी उमेद मिळेल. मग कधीही काहीच मागे राहणार नाही....

**समाजात वावरताना या गोष्टी आचरणात आणा:** १. एखादी व्यक्ती आपला फोन उचलत नसेल तर त्या व्यक्तीला दोन वेळेच्यावरती परत फोन करू नका कदाचित त्या व्यक्तीला त्यावेळेस तुमच्या फोनपेक्षा महत्त्वाचे काम असेल. २. तुम्ही एखाद्याकडून उधार घेतलेले पैसे त्याने परत मागण्याअगोदर परत करा, तीच गोष्ट छत्री आणि पेनबाबत. ३. एखादा तुम्हाला हॉटेलमध्ये जेवायला नेतो तेव्हा मेनूतील महागडा पदार्थ ऑर्डर करू नका, शक्य असल्यास देणाऱ्यालाच ऑर्डर करायला सांगा. ४. तुझ अजून लग्न झालं नाही ? तू अजून घर बांधलं नाहीस ? असले समोरच्याला अडचणीत टाकणारे प्रश्न विचारु नका कारण ती तुमची अडचण नाही. ५. नेहमी आपल्या पाठून येणाऱ्या व्यक्तीसाठी दरवाजा उघडा मग ती व्यक्ती स्त्री असो वा पुरुष कारण कुणाला चांगली वागणूक दिल्याने तुमचा कमीपणा होत नाही. ६. तुम्ही मित्राबरोबर टॅक्सी शेअर केलीत आणि त्याचे भाडे त्याने दिले तर पुढच्या वेळेस तुम्ही भाडे द्या. ७. सगळ्या राजकीय मतांचा आदर करा. ८. कधीच कोणाचे संभाषण मध्येच खंडीत करु नका. ९. जर तुम्ही कोणाची मस्करी करत असाल आणि त्या व्यक्तीला त्याचा त्रास होत असल्यास ती मस्करी ताबडतोब थांबवा. १०. जो मदत करतो त्याला धन्यवाद द्या. ११. एखाद्याची स्तुती सगळ्यांसमोर करा पण त्याचे दोष त्यालाच सांगा. १२. कोणाच्या वजनावर भाष्य करण्याची काही आवश्यकता नसते. फक्त म्हणा तु छान दिसतोस किंवा दिसतेस, जर त्यांना वजन कमी करायचं असेल तर ते तुमच्याशी बोलतील. १३. जेव्हा एखादा त्याच्या मोबाईल मधील फोटो तुम्हाला दाखवतो तेव्हा डावी उजवीकडे स्क्रोल करु नका, कारण तुम्हाला कल्पना नसते पुढे काय दिसेल. १४. जेव्हा आपला सहकारी डॉक्टरकडे जातो आहे असं म्हणाला तर, कशासाठी का असे प्रश्न विचारु नका फक्त तू ठिक आहेस अशी आशा करतो एवढच म्हणा. त्याला सांगायचं असल्यास तो सांगेल, तुम्ही त्याला खाजगी स्वरुपाच्या आजाराबाबत विचारून खजील करु नका. १५. जेवढा मान साहेबाला द्याल तेवढाच शिपायाला द्या. आपल्या हाताखालच्या माणसांना तुम्ही कीती आदराची वागणूक देता यावर तुमच्या व्यक्तिमत्त्वाची उंची ठरवली जाते. १६. एखादा माणूस आपल्याशी समोरासमोर बोलत असल्यास सतत मोबाईल मध्ये लक्ष देणे ही अक्षम्य चूक ठरते. १७. जो पर्यंत सल्ला मागितला जात नाही तोपर्यंत देऊ नका. १८. जेव्हा एखाद्याशी बऱ्याच वर्षांनी भेटत असाल तेव्हा जोपर्यंत विषय निघत नाही तोपर्यंत त्याचे उत्पन्न व वय याबाबत विचारु नका. १९. जोपर्यंत एखाद्या विषयात तुम्हाला समाविष्ट

केले जात नाही तोपर्यंत त्या विषयापासून लांब रहाणे योग्य. २०. रस्त्यात कोणाशी भेट झाल्यास गॉगल काढून संभाषण सुरु करा, ह्यातून आदर प्रतित होतो तसेच साफ संभाषणाच्या दृष्टीने डोळ्यांचा संपर्क आवश्यक असतो.

## आरोग्य सेवा ग्रुप प्रस्तूत आयुर्वेदीय कविता

खोकून खोकून कोरडा झाला जर का घसा।
मधातून चाटा हळद, ज्येष्ठमध आणि अडुळसा।।

लागला मुका मार, सुजून पाय झाला असेल गारद।
लेपासाठी उगाळा तुरटी, रक्त चंदन, आंबेहळद।।

कोंड्याचा झाला आहे कां डोक्यामधे साठा?
केस धुतांना लावा मेंदी, शिकेकाई, रिठा।।

सकाळी सकाळी उठा देवाला करा तुम्ही वंदन।
उन्हाळ्यात थंडाव्यासाठी कपाळी लावा चंदन।।

उन्हामधे रापून चेहरा झाला कां सावळा गडद?
कांती उजळण्यासाठी दुधातून प्या थोडी हळद।।

बारीक आहे कुडी म्हणून होऊं नको तू बावरी।
दूध आणि साखरेबरोबर खा थोडी शतावरी।।

पिकला एक केस होईल डोक्यावर चांदी।
नैसर्गिक रंग आहे, केसांना लावा मेंदी।।

केसांना लावा कचूर सुगंधी, मेंदी, जास्वंद।
केस होतील लांब सडक, सुगंध दरवळेल मंद।।

गाणं म्हणण्यासाठी झालां आहात तुम्ही अधीर।
गोड मधुर आवाजासाठी खा ज्येष्ठमध, शंगीर।।

अशक्तपणामुळे तुमचा दुखतो आहे का सांधा?
शक्तीसाठी गायीच्या दुधातून घ्या अश्वगंधा।।

पित्तप्रकोप झाला आहे, पोटातून येत आहेत कां कळा?
पोटात घ्या आवळा, हिरडा, बेहडा म्हणजेच त्रिफळा।।

वातामुळे पोटामध्ये होत आहेत कां वेदना?
खा ओवा, सैंधव मीठ, आलं, लिंबू पुदिना।।

संगणकावर काम करून थकली आहे कां नजर?
डोळ्यांसाठी खावे चांगले पपई आणि गाजर।।

लहान वायामध्येच ढोलमटोल झाला कां तुमचा बेटा?
जाडी कमी करण्यासाठी जरा कमी खा बटाटा।।

धूर धूळ प्रदूषणाचा झाला आहे आता कळस।
शुद्ध हवेसाठी झाडे लावा कडूनिंब आणि तुळस।।

छोटे छोटे आजार, बरं कां, घरच्या घरीच हटवा।
प्रत्येकाच्या घरी असूद्या आजीबाईचा बटवा।।

## सुविचार २०२०

▸ आपल्या धावपळीच्या जीवनात आपण ठराविक ठिकाणी 'तडजोड" हा पासवर्ड वापरायला शिकलं की आपलं संपूर्ण आयुष्य हे आनंदी आणि सुखी होते. ▸ वाईट वेळ निघून जाते. परंतू जाताना चांगल्या चांगल्या लोकांच खरं रुप दाखवून जाते. वळणा-वळणाचे 'आयुष्य" असावे, त्यात 'काटे ही" असावे, 'वेदना ही" असावी पण 'विश्वास" तोडणारं कोणी नसावं. ▸ माणसांचा संग्रह करणं इतकंही सोपं नसतं, जितकं पुस्तकांचा संग्रह करण... कारण पुस्तकांचा संग्रह करण्यासाठी पैशांची गुंतवणूक करावी लागते तर माणसांचा संग्रह करण्यासाठी भावनांची कदर करावी लागते. आयुष्यात पैशाने कमावलेल्या वस्तूंपेक्षा स्वभावाने कमावलेली माणसं जास्त आनंद देतात. ▸ आयुष्याच्या प्रवासात वेगापेक्षा दिशा ही फार महत्त्वाची आहे. जर का दिशाच ठाऊक नसेल तर वेगाचा उपयोग तरी काय? ▸ इच्छा किती विचित्र गोष्ट आहे, पूर्ण झाली नाही तर क्रोध वाटतो, आणि पूर्ण झाली तर लोभ वाढतो. ▸ चूक नसताना सुध्दा निव्वळ वाद टाळण्याकरिता मागितलेली माफी हे, जीवनातील संयमाचं एक मोठं उदाहरण ठरतं... जीवनात संयम राखला तर आपले महत्त्व कुणीच कमी करु शकत नाही. ▸ कर्तव्यांशी एकनिष्ठ असणारी माणसे जीवनात कधीही अपयशी ठरत नाहीत. ▸ जगणं ठाऊक असलेल्यांना वागणं कसं असावं हा प्रश्न कधीच पडत नाही. ▸ समुद्रातील तुफानापेक्षा मनातील वादळे अधिक भयानक असतात... म्हणून मनातल्या गोष्टी जवळच्या व्यक्तींना नक्की सांगा कारण त्याने मन हलके तर होईलच आणि लढण्याची ताकद पण येईल.

# तत्त्वज्ञ आणि उदासीन

- संपदा वागळे



**तत्त्वज्ञ आणि उदासीन । बहुश्रुत आणि सज्जन । मंत्री आणि सगुण नीतिवंत ।।**

समर्थ रामदास म्हणतात, 'वेदांमधील सर्व तत्त्वं आणि महावाक्यं यांचा सम्यक अभ्यास असूनही ते मिरवण्याची हौस नाही. विविध विषयांची जाण आहे; परंतु त्याचा अजिबात गर्व नाही, असा महंत सज्जन मानावा.' ही व्याख्या डोंबिवलीतील डॉ. भीमराव कुलकर्णी या ९७ वर्षीय साधकाला तंतोतंत लागू पडते. जी. एस. वैद्यकीय महाविद्यालयात ४६ वर्षे शिकवून निवृत्त झाल्यावर त्यांनी गेली ३३ वर्षे वेदांच्या मराठी अनुवादाच्या कामात स्वतःला झोकून दिलं आहे. यातील ऋग्वेदाच्या १०५४० ऋचांचे ५ खंड २००८-०९ मध्ये तर यजुर्वेदाच्या २५०० ऋचांचे २ खंड २०१३ मध्ये प्रसिद्ध झालेत. येत्या फेब्रुवारीत डॉ. कुलकर्णी ९८ व्या वर्षात पदार्पण करतील. त्या आधीच त्यांचं उर्वरित वेदांच्या (सामवेद व अथर्ववेद) अनुवादाचं काम पूर्ण होईल.

डॉ. कुलकर्णी आजही दिवसातले आठ तास लिखाण करतात. अनुवाद करताना प्रथम वेदातील ऋचा देऊन त्याखाली त्यातील संस्कृत शब्दांच्या अर्थासह भाषांतर व शेवटी आजच्या परिस्थितीनुरूप त्यावर भाष्य या त्यांच्या सूत्रामुळे वाचकांना सर्वंकष ज्ञान मिळतं. त्यांची पत्नी सहा वर्षांपूर्वी निवर्तली. दोन्ही मुलं सुविद्य व सुस्थितीत असूनही त्यांच्या आग्रहाला बळी न पडता ते डोंबिवलीतील आपल्या घरी एकटे राहतात. कारण त्यांना मनन-चिंतन-लेखन करण्यासाठी एकांत हवा असतो. सकाळी चार वाजता गजर न लावता त्यांना जाग येते.

तेव्हापासून रात्री साडेनऊला अंथरुणाला पाठ टेकेपर्यंत ते त्यांच्या कामात व्यग्र असतात. जेवणासाठी डबा येतो. एखादा दिवस तो आला नाही तरी त्यांचे काहीही अडत नाही. कारण पोळी-भाकरीपासून सगळा स्वयंपाक ते आजही करू शकतात. तसंच दूध आणण्यापासून बिलं भरण्यापर्यंत कोणत्याही कामात त्यांना दुसऱ्याची मदत लागत नाही.

डॉ. भीमराव कुलकर्णी यांना वेदांच्या वाटेकडे वळवण्याचे श्रेय त्यांचे वाईच्या शाळेतील संस्कृतचे गुरुजी लक्ष्मण विष्णू गोटखिंडीकर यांचं. अकरावीच्या परीक्षेत त्यांना संस्कृतमध्ये शंभरपैकी नव्याण्णव गुण मिळाले तेव्हा गुरुजी म्हणाले, "मनाशी एक खूणगाठ बांधून ठेव... समाजाचा सर्वांगीण विकास साधायचा असेल तर घराघरांत वेद-उपनिषदे पोहोचली पाहिजेत. त्यासाठी तू चारही वेदांचा अर्थ मराठीत लिहून तो प्रसिद्ध कर. तुला ते नक्की जमेल..." ही गुरुआज्ञा त्यांच्या मनावर एवाद्या वज्रलेपाप्रमाणे उमटली. त्यानुसार निवृत्तीनंतरचं आयुष्य याच कार्यासाठी समर्पित केल्यावर आता लवकरच ते गुरुवचनातून मुक्त होतील.

बोर्डाच्या परीक्षेत त्यांची 'जगन्नाथ शंकरशेट' स्कॉलरशिप एका गुणाने हुकली. पण ही कसर पुढे त्यांच्या नातवाने-कौस्तुभने भरून काढली. कौस्तुभ आज अमेरिकेतील टेक्सास राज्यातील डल्लास येथे एका रुग्णालयाचा डीन आहे. डॉक्टरांची सर्वच नातवंडं उच्चशिक्षित आहेत, त्याबरोबर संस्कृतप्रेमीही आहेत. ऋग्वेद व यजुर्वेद यांच्या अनुवादाचे सात खंड डॉ. कुलकर्णी यांनी स्वखर्चाने प्रकाशित केले. त्या ग्रंथांना एवढा प्रतिसाद मिळाला की, आज त्यांची एकही प्रत शिल्लक नाही. खर्च वजा करून उरलेले पैसे त्यांनी गरजूंना दान केले हे काम सुरु असतानाच डोंबिवलीतील विवेकानंद केंद्राच्या मराठी प्रकाशन विभागाने नित्यपाठाची वैदिक सूक्ते हे संस्थेने आधीच प्रकाशित केलेले पुस्तक सुधारून ते कामही डॉ. भीमराव यांनी आनंदाने व अर्थातच विनामोबदला केलं. मात्र आता राहिलेल्या वेद अनुवादांच्या प्रकाशनाची जबाबदारी दाजीशास्त्री पणशीकर यांनी स्वीकारल्याने ते निश्चिंत आहेत. हे काम हातावेगळं झाल्यावर पुढची दिशाही ठरलेली आहे. दोन आरण्यकं (गृहस्थाश्रमातून) वानप्रस्थाश्रमात गेल्यावर दिनचर्या कशी असावी याचं मार्गदर्शन) व दोन ब्राह्मणं (ज्ञानाच्या उपासकाने इतरांशी कसं वागावं) यांचा अनुवाद करणार आहेत. प्राध्यापकी करतानाच त्यांची या शास्त्रातील दोन पुस्तके प्रकाशित झाली. त्यातील के.ई.एम. हॉस्पिटल फार्माकोपिया या औषधविषयक ज्ञानकोशाच्या आजवर आठ आवृत्या निघाल्या आहेत. महाराष्ट्र शासनाच्या महाकवी कालिदास संस्कृत साधना सन्मानासह अन्य ३५ पुरस्कारांनी त्यांना गौरवण्यात आलंय. संस्कृतशी त्यांची नाळ जोडलेली असली तरी आधुनिक तंत्रज्ञानाशी

जोडलेले राहण्यासाठी त्यांनी निवृत्तीनंतर इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंच्या देखभालीचा डिप्लोमा घेतला. त्यामुळे टीव्ही, मोबाईलसह सर्व घरगुती उपकरणांची दुरुस्ती ते स्वतः करतात. शाळेत असताना सुतारकाम हा विषय अभ्यासाला असल्याने या आवडीतून घरातली पुस्तकांची लाकडी कपाटे त्यांनी स्वतः बनवलीत. वयाच्या नव्वद-ब्याण्णवाव्या वर्षापर्यंत ते एका वेळेला ५० बैठका व तितकेच जोर काढत होते. आता ते जमत नाही, पण वाईला धाकट्या भावाकंडे गेल्यावर सायकलने गावात भटकणे आणि कृष्णेच्या पाण्यात पोहणे झाल्याशिवाय त्याच्या पाय आजही निघत नाही. त्यांना प्रवासाचीही आवड आहे. त्यासाठी कुठल्याही वाहनाने जाणे त्यांना आवडते आणि झेपते. आज शतकपूर्तीला तीन वर्षे उरली असताना त्यांच्या मनात कृतकृत्येची भावना आहे. गुरुवचनासाठी केलेल्या ज्ञानयज्ञाची आता सांगता होत आहे, यापेक्षा आनंद तो कोणता ?

**महत्वाची विनंती : मध्यवर्ती मंडळाचे सभासद व संलग्न संस्था यांना कळकळीची विनंती की त्यांनी व्यक्तीशः किंवा संस्थेच्या वतीने निधी संकलन करून त्याबद्दल स्पष्ट उल्लेख करून मध्यवर्ती मंडळाकडे पाठवावा. ऋग्वेद व यजुर्वेद ग्रंथ शिल्लक नाहीत. ते पुन्हा छापणे आवश्यक आहे. शिवाय त्यांचे विद्यमान प्रकल्पही खर्चीक आहेत. श्री. दाजी शास्त्री पणशीकरांनी जबाबदारी घेतली असली तरी त्यांचे वय व त्यांचे व्याप लक्षांत घेऊन ही निधी संकलनाचे काम अत्यावश्यक आहे. याचा सखोल विचार करून हे निधी संकलन करावेच करावे. ही कळकळीची विनंती. आपला सगळ्यांचा निधी मध्यवर्तीकडे आल्यावर त्यात मध्यवर्ती मंडळ भर घालून हे वैदीक ग्रंथ प्रकाशित करण्याचे काम मार्गी लावण्यासाठी आपला हातभार लावेल. - संपादक**



आपणां सर्वांना कळविण्यास आनंद वाटतो की, दिनांक ०५ जानेवारी २०२० या नवीन वर्षातील पहिला रविवार आपल्या देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, कल्याणच्या जेष्ठ व श्रेष्ठ सदस्या सौभाग्यवती विशाखाताई गाडगोळी यांना काल डोंबिवली येथे झालेल्या परशुराम सेवा संघ, ठाणे जिल्हा, बैठकीत त्यांनी उद्योग क्षेत्रात केलेल्या कामगिरी बद्दल उद्योग रत्न हा पुरस्कार परशुराम सेवा संघ, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष श्रीमान विश्वजीत देशपांडे यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी परशुराम सेवा संघ, राष्ट्रीय अध्यक्ष श्रीमान अनिल मुळे, उपाध्यक्ष श्रीमान उल्हास अकोलकर, अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाचे अध्यक्ष श्रीमान विलासराव जोशी, चित्पावन ब्राह्मण संघ, अंबरनाथ विश्वस्त सौ. वंदनाताई पटवर्धन, सकल ब्राह्मण संस्था, कल्याणचे संस्थापक श्रीमान शेखर कुलकर्णी व इतर मान्यवर उपस्थित होते. सौ. विशाखाताईंचे हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा. समस्त देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, कल्याण कार्यकारिणी व सदस्य परिवाराकडून शुभं भवतू.

---

# देशस्थ ऋग्वेद ब्राम्हण संघ कराड, दिनदर्शिका वितरण सोहळा



## कल्याण संस्थेत श्री समर्थ रामदास स्वामी पादुका पुजन व दर्शन




देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ कल्याण संस्था कार्यालयात श्री समर्थ रामदास स्वामी चरणी पादुकांचे पुजन व दर्शन दिनांक १९ डिसेंबर १९. यावेळी देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ डोंबिवलीचे कार्यवाह श्री व सौ नारायणराव रत्नपारखी, साप्ताहिक कल्याण वैभवचे संपादक श्री विश्वासराव कुलकर्णी. तसेच अनेक सदस्य व हितचिंतकांनी समर्थ चरण पादुकांचे दर्शन घेतले. हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

## पुणे संस्थेचा सुरेखा बेलसरे स्मृतिनिमित्त 'स्वरांच्या हिंदोळ्यावर' कार्यक्रम



जेष्ठ गायिका स्व. सुरेखा बेलसरे यांच्या स्मृतिनिमित्त देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ या संस्थेच्या वतीने महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या (मसाप) सभागृहामध्ये 'स्वरांच्या हिंदोळ्यावर, कार्यक्रमाचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते.' प्रसिद्ध गायिका चारुशीला बेलसरे यांनी त्यांची गुरूमाता सुरेखा बेलसरे यांना गीतांद्वारे श्रद्धांजली अर्पण केली. अनुजा कल्याणकर, लता कुलकर्णी, सोनाली कुलकर्णी, अविनाश सलगरकर, मुकुंद जोग, दीपक एकबोटे, नरेन काळे यांनी साथ संगत केली. याप्रसंगी अनुजा कल्याणकर यांना मानवता पुरस्कार प्रदान करण्यात आला. वैद्यकीय अधिकारी नीलकंठ शहाणे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

## ठाणे संस्थेच्या दिनदर्शिकेचे अनावरण



प्रतिवर्षीप्रमाणे देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ ठाणे संस्थेच्या सन २०२० दिनदर्शिकेचे अनावरण ठाणे शहरातील ९३ वर्षांची परंपरा असलेल्या ब्राह्मण सभेचे प्रमुख विश्वस्त श्री अशोक जोशी यांच्या शुभ हस्ते अनावरण झाले. दरवर्षी दिनदर्शिकेत काहीतरी नवीन विषय घेऊन समाजोपयोगी माहिती देण्याचा सातत्याने प्रयत्न ठाणे संस्थेतर्फे केला जातो. यंदा औषधांच्या वापराविषयी तसेच औषधे घेण्यासंदर्भात, शस्त्रक्रियेसाठी रुग्णालयात दाखल होण्यासाठी, पर्यटनाला जाताना बरोबर कुठली औषधे घ्यावीत, घरातील औषधे कशाप्रकारे सुयोग्य स्थिती ठेवावीत, खराब झालेली औषधे कशाप्रकारे फेकून द्यावी, प्रिक्रिप्शन कसे वाचावे इत्यादी अनेक गोष्टींवर सरळ सोप्या भाषेत या दिनदर्शिकेचे मार्फत प्रकाश टाकण्यात आला आहे. भारतीय प्राचीन नाण्यांचा इतिहास तसेच भारतीय रुपया विषयी अत्यंत मनोरंजक व विस्तृत माहिती सदर दिनदर्शिकेत देण्यात आली आहे. मध्यवर्ती मंडळातर्फे शैक्षणिक विषयाकरिता देण्यात येणाऱ्या पारितोषिकांची संपूर्ण माहिती दिनदर्शिकेत देण्यात आल्याने मध्यवर्ती मंडळाच्या तसेच ज्ञाती बांधवांच्या पाल्यांना ही माहिती उपयोगी ठरेल. प्रतिवर्षीप्रमाणे महिलांसाठी उपयुक्त टिप्स तसेच विवाह व उपनयन मुहूर्त देखील दिनदर्शिकेत देण्यात आले आहेत. ठाणे संस्थेच्या दिनदर्शिकेची ज्ञाती बांधवांना व्यतिरिक्त इतर समाज बांधवांकडून देखील दरवर्षी अधिक प्रतींची विचारणा होत असल्याचे समाधान व आपण समाजाला काहीतरी चांगले देण्याचे समाधान ठाणे संस्थेचे अध्यक्ष तसेच मध्यवर्ती मंडळाचे अध्यक्ष श्री विलास जोशी यांनी व्यक्त केले. सदर दिनदर्शिकेसाठी डोंबिवली, विलेपार्ले, नाशिक, कराड, अकोला अशा अनेक संलग्न संस्थांनी जाहिरात देणगी देऊन तसेच इतर मान्यवर उद्योजकांनी देऊन संस्थेला देणगी देऊन आर्थिक हातभार लावल्याने अत्यंत अल्पदरात ठाणे संस्था ही दिनदर्शिका आपल्यापर्यंत पोहोचवू शकते. अध्यक्ष श्री. विलास जोशी तसेच श्री. मिलिंद सरदेशमुख यांनी सदर दिनदर्शिके साठी अपार कष्ट घेतले.

**- सचिव श्री. प्रसाद ठकार**

**नवीन सभासद नोव्हेंबर / डिसेंबर २०१९: नाशिक :** श्री. जयदीप श्रीकांत शालीग्राम, श्री. श्रीकांत नरेंद्र शालीग्राम, सौ.हेमलता श्रीकांत शालीगराम, सौ. भक्ती जयदीप शालीग्राम, सौ. विशाखा निखिल शालीग्राम, श्री. निखिल श्रीकांत शालीग्राम, सौ.मृदुला अशोक देशपांडे, श्री. अशोक प्रभाकर देशपांडे, श्री. प्रदिप मुरलीधर कुलकर्णी, श्री. शैलेंद्र दत्तात्रय देशपांडे, श्री.सुहास शरदचंद्र इनामदार, श्री. शिरिष सदाशिव कुलकर्णी, श्री. महेश रंगनाथ देशपांडे, श्री. मिलिंद शामराव बक्षी. **अकोला :** श्री. अरुण यशवंतराव कुलकर्णी, श्री. संजय श्रीकृष्ण गंगाखेडकर, श्री. अनिल जनार्दन जोशी, सौ. शुभांगी संजय जोशी. **हैदराबाद :** श्री. मदन सदाशिवराव क्षिरसागर, श्री. लक्ष्मीकांत वसंतराव कुलकर्णी, श्री. श्रीपाद नारायणराव देशपांडे. **लातूर :** श्री. किशोर पुरुषोत्तम कुलकर्णी, श्री. भास्कर माणिकराव खेडमनोरकर, सौ. उज्वला प्रदीपराव कुलकर्णी, श्री. प्रदीप जनार्धनराव कुलकर्णी, श्री. महेंद्र देविदासराव जोशी, सौ. संध्या महेशराव मोकाशी, श्री. महेश अंबादासराव मोकाशी, श्री. बालाजी रामराव कुलकर्णी, सौ. शुभांगी मधुकरराव कुलकर्णी, श्री. धनंजय रामराव कुलकर्णी, सौ. शिला धनंजय कुलकर्णी. **नांदेड :** सौ. वैजयंती हरी कुंभोजकर, श्री. सुरेश माणिकराव कुलकर्णी. **परभणी :** श्री. सुहास प्रभाकरराव धारासूरकर. सौ. सुप्रिया सुहास धारापूरकर. **सायन-मुंबई :** श्री. आदित्य अतुल देशपांडे , सौ. अश्विनी अतुल देशपांडे. **मुंबई :** श्री. चैतन्य अनिलकुमार जोशी. **मुलुंड :** श्री.श्रीकांत रामकृष्ण फौजदार. **सोलापूर :** श्री. सुरेंद्र शामराव पत्की**. अमरावती :** श्री. विलास केशवराव पेठकर**. उस्मानाबाद:** श्री. रामचंद्र गुंडेराव कुलकर्णी

---

**संलग्न संस्थाना महत्त्वाची सूचना :** अलीकडे मध्यवर्ती मंडळाचे सभासद करण्याचे काम संलग्न संस्था करीत आहे. तथापी आपल्या समाजाची संख्या काही कारण असतांना आज मितीस सभासदांची साडे सात हजार ही संख्या फारच तोकडी ठरते. संलग्न संस्थांनी मध्यवर्ती सभासद नोंदणीवर अजूनही भर द्यावा ही विनंती.

---



देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संघ, कल्याण, आयोजित करण्यात आलेल्या इयता १० वी माध्यमिक शालांत परीक्षेस बसलेल्या आदिवासी पाड्यावरील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक मार्गदर्शनपर शिबिराचे उद्घाटन आपल्या संस्थेचे ज्येष्ठ सदस्य माजी शिक्षक आमदार माननीय श्रीमान प्रभाकरपंत संत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्था अध्यक्ष श्रीमान सुरेशराव कुळकर्णी, उपाध्यक्षा सौ. ॲड. संपदा कुळकर्णी, कोषाध्यक्ष श्री. दिपकराव देशपांडे, संयोजक श्री. अनिरुद्ध मांडे, आज पहिला पेपर मराठी विषयासाठी मान्यवर मार्गदर्शक शिक्षक श्रीमान व्यंकटेश प्रभुदेसाई हे लाभले होते. तसेच छत्रपती शिक्षण मंडळाचे पदाधिकारी व नांनकर सांगे विद्यालयाचे मुख्याध्यापक व समस्त शिक्षकवर्ग उपस्थित होते.

**वधू पाहीजे**

**नांव : विपुल श्रीराम कुलकर्णी. जन्म:** ०७/७/१९८२. **जन्म वेळ:** बुधवार, सकाळी ०८.२२, पुणे. **उंची :** ६ फूट. **रक्त गट :** B+. **शिक्षण :** Diploma in Business Management (UK), Hotel Management & B.Com**. व्यवसाय :** Operational Manager in White Monkey (Juice Co.), Pune. **वार्षिक उत्पन्न :** ५ लक्ष. **ब्राह्मण पोटशाखा :** देशस्थ ऋग्वेदी. **रास : धनु. चरण पहिले. नक्षत्र: उतराषाढा, नाडी: अंत्य, गण: मनुष्य, गोत्र :** शांडिल्य**. आई / वडील आहेत. बहिण २ विवाहित. पत्रव्यवहारासाठी नांव व पत्ता:** श्री. श्रीराम गजानन कुलकर्णी, सी/७०१, शिंदे पार्क हौसिंग सोसायटी, एन.डी.ए. रोड, शिवणे, पुणे ४११०२३. **भ्रमणध्वनी :** वडील: ९६८९७९०१०५/ विपुल : ७९७२३१८३६५.

**ईमेल:** shriramkulkarni@gmail.com / vipulvipul82kulkarni@gmail.com

## वधू पाहीजे

**नांव : केयुर अनिल पानसे. पत्ता :** फ्लॅट नं. ८, बिपीन हौ. सोसायटी, १९ वाळवेकर नगर, पर्वती, पुणे ४११००९. **ब्राह्मण पोटशाखा :** देशस्थ ऋग्वेदी**. जन्म:** १५/१२/१९८९. **गोत्र :** मुद्‌गल. **उंची :** ५ फूट ८ इंच, **मंगळ नाही. वर्ण:** गहुवर्ण. **शिक्षण :** बी.ई.मेकॅनिकल. **व्यवसाय :** नोकरी पुणे येथे. **मासिक उत्पन्न :** ५५,०००. पत्रिका पाहणार. **आई आहे/ वडील आहेत. भाऊ एक विवाहीत. वधुसंबंधी अपेक्षा :** सुस्वभावी, मनमिळाऊ, सर्वांना धरुन राहणारी. **पत्रव्यवहारासांठी नांव व पत्ता:** फ्लॅट नं. ८, बिपीन हौ. सोसायटी, १९ वाळवेकर नगर, पर्वती, पुणे ४११००९. **भ्रमणध्वनी :** ९३७१६७७३८९

## वधू पाहीजे

**नांव :** संजीव रामचंद्र घळसासी**. पत्ता :** अनंत बंगला, प्लॉट नं. ८०, संगम सोसायटी, सातारा रोड, विवेकानंद स्मारकाजवळ, बिबवेवाडी, पुणे ४११०३७. **ब्राह्मण पोटशाखा :** ऋग्वेदी**. जन्म:** १५/०२/१९८८. **गोत्र :** जमदग्नी. **उंची :** ५ फूट ८ इंच, **मंगळ आहे सौम्य. वर्ण:** गहु. **शिक्षण:** B.Com & Event Management. **व्यवसाय :** नोकरी W.N.S. (M.N.C.), मगरपट्टा, हडपसर, पुणे येथे. **मासिक उत्पन्न :** ४०,०००. पत्रिका पाहणार. **आई आहे/ वडील आहेत. भाऊ नाही/बहिण एक विवाहीत. रक्त गट :** AB+, **पत्रव्यवहारासांठी नांव व पत्ता:** अनंत बंगला, प्लॉट नं. ८०, संगम सोसायटी, सातारा रोड, विवेकानंद स्मारकाजवळ, बिबवेवाडी, पुणे ४११०३७. **भ्रमणध्वनी :** ९९७०९६७००४ (W.A.) / ९८२२८४६५५६/०२०-२४२११९५६

## वधू पाहीजे

**नांव : ऋतुराज उदय कडीकर. ब्राह्मण पोटशाखा :** देशस्थ ऋग्वेदी**. जन्म:** १९/०८/१९८८. **गोत्र :** अत्रि. **वय :** ३१ वर्षे**. उंची :** ५ फूट ८ इंच, **मंगळ नाही. वर्ण:** गोरा. **शिक्षण :** एम्. टेक. (कम्यु.). **व्यवसाय :** नोकरी-सॉफ्टवेयर डेव्हलपर, पुणे. **मासिक उत्पन्न :** ५०,०००. **पत्रिका पाहणार. आई / वडील आहेत. भाऊ एक/बहिण नाही. वधुसंबंधी अपेक्षा:** अनुरुप, ग्रॅज्युएट, मनमिळाऊ, नोकरीस प्राधान्य, शाकाहारी, ब्राह्मण-पोटशाखा. **रक्त गट :** O+. **पत्रव्यवहारासांठी नांव व पत्ता:** श्री. उदय चं. कडीकर, ००४/नी, राजा शिवाजी मार्ग, त्र्यंबक अपार्टमेंट, विरार (प.) ४०१३०३. **भ्रमणध्वनी :** श्री. कडीकर उदयः ९८८१४०८३७२ / सौ. कडीकर : ९६२३०२०७२७

## वर पाहीजे

**नांव : विधात्री जयंत आगरकर. पत्ता:** ई-३०३, सन रेसीडेन्सी, प्रमुख रेसीडेन्सीच्या समोर, दामन रोड, छाला, वापी ३९६१९१, गुजरात. **ब्राह्मण पोटशाखा :** देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण. **जन्म:** २५/५/१९९०. **गोत्र :** अगस्ती. **वय :** २९ वर्षे**. उंची :** ४ फूट, ११ इंच. **मंगळ आहे. वर्ण:** गहू. **शिक्षण :** M.Sc. Biotechnology**. व्यवसाय :** नोकरी. **मासिक उत्पन्न :** २५,०००. **पत्रिका पाहणार**. **रक्त गट :** B Rh+, **आई आहे/ वडील आहेत. भाऊ नाही /बहिण नाही. वरासंबंधी अपेक्षा :** सुशिक्षित, उच्चशिक्षित, संस्कारी, अनुरुप असावा. **पत्रव्यवहारासाठी नांव व पत्ता:** वरील प्रमाणे **भ्रमणध्वनी :** ७२०२०९४४३६ / ०९०१६१३०७६७

## वधू पाहीजे

**नांव : आदित्य पुरुषोत्तम जोशी.**
**ब्राह्मण पोटशाखा :** देशस्थ ऋग्वेदी.
**जन्म:** १२/१०/१९८८. **गोत्र :** वशिष्ठ.
**उंची :** ५ फूट ५ इंच, **मंगळ नाही.**
**शिक्षण :** एम.एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स).
**व्यवसाय :** नोकरी (Cosmos Co-op Bank (IT Dept.). **मासिक उत्पन्न :** ३८,०००. **पत्रिका पाहणार.**
**रक्त गट :** B-ve, **आई आहे/ वडील आहेत. भाऊ/बहिण नाही. वधुसंबंधी अपेक्षा :** नोकरी करणारी, सुस्वभावी. **पत्रव्यवहारासांठी नांव व पत्ता:** बी५/६, सर्वत्र सोसायटी, कृष्णा हॉस्पिटल जवळ, पौड रोड, कोथरुड, पुणे -४११०३८. **भ्रमणध्वनी :** ९८५०८४४७४०

## वर पाहीजे

**नांव : अपूर्वा मोहन बहिरट.**
**ब्राह्मण पोटशाखा :** देशस्थ. **गोत्र :** बादरायण.
**जन्म:** ११/७/१९९३. **उंची :** ५ फूट.
**मंगळ नाही. वर्ण:** गहू. **शिक्षण :** बी.कॉम.
**व्यवसाय :** नोकरी. **पत्रिका पाहणार.**
**जन्मवेळ** ११.३५, **जन्म ठिकाण :** नाशिक.
**रक्त गट :** A+, **आई आहे/ वडील आहेत.**
**भाऊ नाही / एक बहिण (विवाहीत)**
**वरासंबंधी अपेक्षा :** निरव्यसनी, ग्रॅज्युऐट किमान, मुंबईत राहणारा, मनमिळाऊ.
**पत्रव्यवहारासाठी नांव व पत्ता:** साईनाथ सोसायटी, ३/३६६/२०, चारकोप, कांदिवली (प), मुंबई-६७.
**भ्रमणध्वनी :** ९८७०७१४७३०




# जीवनसाथी-सुयोग्य निवडीसाठी

पुनर्विवाह इच्छुक, मुंबईतील, परदेशातील
उच्च मध्यमवर्गीय, उच्चशिक्षित,
आर्मि, नेव्ही, डिफेन्स, किंचित व्यंगाची
किंवा पालकांत दोष असलेल्या स्थळांसाठी

★★★

**वेळ : रोज सकाळी ११ ते संध्याकाळी ५**

**शुक्रवारी बंद**

**संपर्क : २४३०५६०७**

**मेघा दामले**

इंद्रवदन, पद्माबाई ठक्कर रोड,
सेनाभवनसमोर, माहीम, मुंबई - ४०० ०१६.

# श्री. शरदचन्द्र देशपाण्डे

M.A.L.L.B.

**ADVOCATE**

Asst. Secretary L.I.C. of India Z. O. Hyd. (Retired)
H. No. 8-3-978/13, Shri Nagar Colony, Hyd.

Life Member : अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, मुम्बई
Life Member : अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मण्डळ शाखा, हैद्राबाद
Life Member : मराठी ग्रंथ संग्रहालय, हैद्राबाद
Life Member : महाराष्ट्र मंडळ, तेलंगणा, हैद्राबाद
Life Member : मराठी साहित्य परिषद, तेलंगणा, हैद्राबाद
Life Member : बृहन् महाराष्ट्र मंडळ, नई दिल्ली.
Life Member : Sr. Citizen Seva Samithi, Hanuman Nagar, Hyd.
Treasurer : Sat Sri Keshav Swamy Seva Samithi, Hyd.
Life Member : Insurance Corporate Retired Employees Association
Life Member : Bharat Gunavardhak Sanstha, Hyderabad
Exe. Committee Member : Shankar Vachanalaya, Telengana, Hyd.


ISO 9001 : 2015 प्रमाणित

## समर्थ सहकारी बँक लि.सोलापूर

प्रधान कार्यालय : अंत्रोळीकर शॉपिंग सेंटर, दत्त चौक, सोलापूर. फोन : ०२१७ - २७४४२१०, २७४४२१३, २७४४२१४

## ३००० कोटींच्या मिश्र व्यवसायाकडे वाटचाल

* समर्थ बँकेच्या उपलब्ध सेवा *

MOBILE BANKING | RTGS/NEFT | IMPS | E-COM/POS | E- PAYMENT | FOREIGN CURRENCY EXCHANGE | LOCKERS | GAS SUBSIDY | BHARAT BILLPAY

**जेष्ठ नागरिकांसाठी व्याजदर ८.७५% (१ वर्षासाठी)**

३२ शाखांमधुन कार्यरत

* मुंबई - दादर ०२२- २४३२४४०१/०२ * कल्याण-०२५-१२२३२९२१/२३ * ठाणे - ०२२-२१७३७७४७/४८ * वाशी - ०२२-२७८८००१४/१५
* पुणे - शिवाजीनगर - ०२०-२५६५७५५६/२५६५७५६५ * हडपसर - ०२०-२६८९०७१२/१३ * चिंचवड - ०२०-२७३७१८१८/२७३७१९१९
बाणेर ०२०-२७२९१५००/०१ * कोथरूड- ७२७६०८२१०१/७२७६०७२१०२ * सिंहगड रोड- ९८८१७११८३० * पिंपरी-०२०-२७४१२९२९/२७४१३०३०
* कोल्हापूर - ०२३१- २५३११४४/४५ * सांगली - ०२३३- २३०२०६५/६६ * मार्केट यार्ड पुणे - ०२०- २९७०६५५०/२९७०५३५०

* सोलापूर शहर व जिल्ह्यात एकुण १८ शाखा कार्यरत *

IndusInd Bank

My ACCOUNT
My NUMBER

# Make your Birth Date
## as your Bank Account Number.

120000111275

Our Other Innovations

Indus Mobile
FINGER PRINT BANKING
Easy, Cool & Safe

VIDEO Branch

Choice Money ATM

QUICK REDEEM SERVICE

DIRECT CONNECT

CASH ON MOBILE ATM

CHECK ON CHEQUE

**For more details, please call our 24 x 7 Phone Banking Numbers : 1880 500 5004/ +91 22 4406 6666.**
**Altemately, you can visit our website : www.indusind.com**

MRH

**Mukund R. Hulyalkar**

painttech CONSULTANTS

**Generations Technology** **Changes BUT** **HULYALKAR SAME**

Visits :

**By Appointment Only**

Available on Phone

9.00 a.m. to 6.00 p.m. (For Local)

10.30 p.m. to 11.30 p.m. (For Outstation)

**Acrylic Distemper 2 Zinc Silicate**

**Complete Paint World**

**"Choice of Bright People"**

**Mukund R. Hulyalkar - Paint Technologist**

| | | |
|---|---|---|
| President | : | Deshastha Rugvedi Brahman Sangh, Dadar |
| I. P. President | : | Colour Society U.D.C.T. Mumbai |
| Secretary | : | Karnataka Progressive Education Society, Mahim, Mumbai |
| Convener | : | ISSPA Central Committee |
| Secretary | : | Govindashram Co-Op. Hsg. Society |
| Patron Member | : | Winner's Circle - Thane |
| Member | : | BIS Committee CHD 20, New Delhi |
| Award | : | Udyogshree By Maharashtra State Government / ISSP Mitra |

Govindashram, (Near Hari Niwas), 224, L. J. Road, Dadar, Mumbai 400 028.
Mobile : 9821099494, Tel. : 022-24456214, Fax : 022-24314865
E-mail : painttech_con@yahoo.com, Website : www.painttechconsultants.com

**R.N.I.16775/68 Regd. No. MCW-126/2018-20,** Published on 15th of every month, Posted at MUMBAI PATRIKA CHANNEL SORTING OFFICE, GPO, Mumbai - 400 001 on, 15th Day of every month.


# अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

अद्यावत नूतनीकरण केलेली

सर्व सोयींनी उपलब्ध अशी दादर - माहीम विभागातील

## मंगल कार्यालये

- तळमजल्यावरील कै. राधाबाई कब्बूर वातानुकूलीत अद्यावत सोयीयुक्त सभागृह
- दुसऱ्या मजल्यावरील अद्यावत सोयीयुक्त सभागृह

### वैशिष्ट्ये

वधू-वरांसाठी खोल्या, स्वयंपाकासाठी किचन

मंगल कार्य ठरताच प्रथम खालील ठिकाणी चौकशी करून कार्यालय आरक्षित करा.

सोसायटीच्या सभा, संगीताचे कार्यक्रम, चर्चासत्रे, परिसंवाद, नाट्य-तालीम, सम्मेलन ह्यासाठी पण हॉल उपलब्ध

## अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ

लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहीम, मुंबई - ४०० ०१६.

दुरध्वनी : २४३० २२ ७३ / २४३० ७५७३ • Email : aadrbm@gmail.com


मुद्रक, प्रकाशक आणि संपादक समिती यांनी **अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळा**च्या वतीने **संदीप ग्राफीक्स, ठाणे (पश्चिम)** ४०० ६०१, येथे छापून **अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ,** लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविंददास मार्ग, माहिम, मुंबई - ४०० ०१६ येथून अंक प्रकाशित केला. **संपादक समिती.**